असा. क्र. १ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५


# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

**सोमवार, जानेवारी ९, २००६ / पौष १९, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.**—महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ याचे निरसन करण्याची आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींची तरतूद करण्याकरिता अधिनियम .. | १-३ |


दिनांक ७ जानेवारी २००६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ९ जानेवारी २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

## महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ याचे निरसन करण्याची आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींची तरतूद करण्याकरिता अधिनियम.

२००५ चा २२. २००३ चा महा. ३१.

**ज्याअर्थी,** संसदेकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अधिनियमित करण्यात आला आहे, आणि म्हणून, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसित करणे आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे असे वाटले ;





[किंमत : रुपये ९.००]

**आणि ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी**, उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसित करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती आणि म्हणून त्यांनी दिनांक ५ ऑक्टोबर २००५ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसन) अध्यादेश, २००५ प्रख्यापित केला होता ; २००३ चा महा. ३१. २००५ चा महा. अध्या. ७.

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसन) अधिनियम, २००५ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ११ ऑक्टोबर २००५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याचे निरसन व व्यावृत्ती.

**२.** (१) महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००३ चा महा. ३१.

(२) असे निरसन झाले असले तरीही, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास,—

(क) शासकीय माहिती अधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेले सर्व अर्ज ; आणि

(ख) अपिलीय प्राधिकारी किंवा, यथास्थिति, लोक आयुक्त वा उप लोक आयुक्त यांच्याकडे प्रलंबित असलेली सर्व अपिले,—

जणू काही हा अधिनियम केला नव्हता असे मानून, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ याच्या तरतुदींनुसार पुढे चालू ठेवण्यात येतील व ती निकालात काढण्यात येतील. २००३ चा महा. ३१.

२००५ चा महा. अध्या. ७.

सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसन) अध्यादेश, २००५ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, या अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमान्वये केलेली गोष्ट किंवा, यथास्थिती, केलेली कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.